## रे.दि.मु.नं.३६९/२०२२ मधील निशाणी ५ खालील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादी तर्फे प्रतिवादींविरुध्द दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १, २ अन्वये तुर्तातुर्त ताकीदीसाठी दाखल केला आहे.

वादीचे अर्जातील हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे–

०२. वादीचे असे कथन आहे की, दावा कलम १ मध्ये वर्णन केलेली मिळकत मौजे मंगरुळ, ता.खानापूर, जि.सांगली येथील मालमत्ता क्र.२७१/३, क्षेत्रफळ ६१६ चौ.फुट कौलारु घर त्यातील सर्व दगड-माती, धोंडे, सर्व इजमेंटरी हक्कासहीत अशी मिळकत वादी यांना त्यांच्या नवऱ्याकडून मिळालेली असून त्यामध्ये ३२ x ३८ फूट मापाचे दगड-विटांचे घर असून त्यामध्ये वादी यांची मालकी हक्क कब्जे वहिवाट आहे व ग्रामपंचायत रेकॉर्डला वादी यांचे भोगवटदार म्हणून नाव आहे. वादी यांच्या तीन मुली असून त्या त्यांचे पतीकडे सुखासमाधानात नांदावयास आहेत. त्यापैकी निर्मला पोपट गायकवाड व कलावती हिंदूराव कांबळे या मुली त्यांना सासरकडील घरामध्ये राहणेची सोय असताना देखील वादी राहते त्याठिकाणीच मंगरुळ येथे राहतात. प्रतिवादी व तिचा पती पोपट हे दोघे मालमत्ता क्र.२७१/३ ही बळकावण्यासाठी वादीला घराबाहेर काढून सदर घरामध्ये दांडगाव्याने घुसून राहणेचे तयारीत आहेत. सदर घरामध्ये वादी तसेच मुलगी बबिता तुकाराम कांबळे व कलावती हिंदूराव कांबळे यांचाही हिस्सा आहे व तो वादीचे पश्चात सर्वांना मिळणार आहे. वादीने दि.२२.०४.२०२२ रोजी प्रतिवादी यांना लेखी नोटीस देऊन कळविले होते. असे असताना दांडगाव्याने प्रतिवादी व तिचे पती घरात घुसण्याचे कृत्य करीत आहेत. प्रस्तुतचा दावा गुण-दोषावर निकाली होणेस बराच कालावधी जाणार आहे. दरम्यानच्या काळात यातील प्रतिवादी यांनी दांडगाव्याने वादी यांचे घरात घुसखोरी केल्यावर व वादीला हुसकावून लावल्यास वादीचे पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार आहे. म्हणून प्रतिवादीने वरीलप्रमाणे कृत्य करुन नये म्हणून तुर्तातुर्त ताकीद देणेची विनंती वादीने केली आहे.

०३.	प्रतिवादी यांनी वादीचे तुर्तातुर्त अर्जास त्यांचे लेखी म्हणणे निशाणी १८ वर दाखल केले आहे. प्रतिवादीने वादीचे तुर्तातुर्त ताकिद अर्जातील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादीचे असे कथन आहे की, दाव्यामध्ये नमूद मालमत्ता क्र.२७१/३ या मिळकतीबाबत प्रतिवादी यांनी वादी व प्रतिवादीच्या दोन बहिणी बबिता कांबळे व कलावती कांबळे यांचेविरुध्द रे.दि.मु.क्र.१६२२/२०२२ हा दावा दाखल केला आहे. सदरची मिळकत वादी व प्रतिवादी यांची समाईकातील असून सदरची मिळकत ही सध्या प्रतिवादी हिचे कब्जे वहिवाटीत आहे. ती पुर्वी पडीक होती. प्रतिवादी व तिचे पती यांनी मिलिटरीतून आलेल्या पैशातून सन १९९६-९७ मध्ये घर मिळकतीचे नवीन स्वरुपात बांधकाम करुन राहत होते. अशा परिस्थितीत वादीचा संपूर्ण संभाळ हा त्याच घरात राहून प्रतिवादी हिने केलेला आहे. परंतु, मागील पाच ते सहा वर्षापासून वादी ही प्रतिवादीच्या इतर बहिणींकडे राहते. अशा परिस्थितीत वादीचे वय झालेने व प्रतिवादीच्या इतर दोन बहिणींना लोभ सुटलेने वादीस तिचे हित-अनहित कळत नसलेचा गैरफायदा घेऊन खोटा व लबाडीचा दावा व ताकीद अर्ज दाखल केला आहे.

०४.	प्रतिवादीचे पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी हे तिचे पतीसह सन १९९६-९७ पासून सदर मिळकतीत राहणेस असून या मिळकतीचे कर, विद्युत बील, तसेच आवश्यक देखभाल प्रतिवादी करति आहेत. वादी ही यामध्ये राहणेस नव्हती व नाही. केवळ कागदोपत्री नोंदीचा गैरफायदा घेऊन वादीचे अन्य दोन मुलींचे सांगणेवरुन सदरचा लबाडीचा व खोटा दावा व तुर्तातूर्त ताकीद अर्ज दाखल केला असून वादीचा तुर्तातूर्त ताकीद अर्ज खर्चासह नामंजूर करणेची विनंती प्रतिवादीने केली आहे.

०५.	वादीतर्फे विधीज्ञ एच.ए.पवार यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री.एस.एन.जाधव यांचा युक्तीवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिपक्षाच्या परस्पर विरोधी कथनांवरून माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह पुढील प्रमाणे देत आहे.

| क्र. | मुद्दे | उत्तर |
|---|---|---|
| १. | वादी यांनी त्यांचे बाजूने प्रथमदर्शनी केस असल्याचे सिध्द केले आहे काय ? | नाही |
| २. | न्यायाचे समतोल वादीचे बाजूने झुकत आहे काय ? | नाही |
| ३. | तुर्तातूर्त ताकीद आदेश न दिल्यास वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे काय ? | नाही |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

## मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ करिता :-

०६. सर्व प्रथम हे नमूद करणे गरजेचे आहे की, तात्पुरत्या मनाई हुकुमाची दाद ही संपूर्णपणे न्यायसंगत आणि न्यायालयाचे विवेकावर आधारीत दाद आहे. सदरची दाद ही न्यायलयाने मंजूर करीत असताना न्याय, समानता (equity) आणि विवेक या तत्वांचा वापर करणे अपेक्षित आहे. सदरची दाद ही न्यायालयाचे न्यायिक विवेकावर आधारलेली असल्यामुळे अर्जदाराने/वादीने हे प्रथम दर्शनी हे दाखविणे गरजेचे आहे की, त्याचा वाद जमीनीवर अधिकार आणि हितसंबंध आहे. त्याचबरोबर गैरअर्जदार/ प्रतिवादीचे कर्तव्य आहे की, त्याने वादीचे अधिकार आणि हितसंबंधांना बाधा पोहचवू नये. याव्यतिरीक्त अर्जदारने/वादीने समानतेच्या तत्वाअन्वये (equity) दाद मागण्यासाठी न्यायालय समक्ष स्वच्छ हाताने समोर यायला पाहिजे.

०७. सदरहू अर्ज हा तुर्तातुर्त ताकिदीचा असलेमुळे केसचा गुणदोषावर विस्तृतपणे ऊहापोह करणे जरुरीचे नाही. तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज विचारात घेत असताना प्रथमदर्शनी कोणाचे बाजूने आहे व अर्ज मंजूर केल्यास कोणाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होईल इतकी मर्यादित बाब विचारात घेणे जरुरीचे आहे.

०८. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये ही बाब निर्विवादित आहे की, वादी ही

प्रतिवादीची आई असून वादी यांना बबिता, निर्मला (प्रतिवादी) व कलावती या एकूण तीन मुली आहेत. वाद मिळकत वादी यांच्या नांवावर असून निशाणी क्र.८ वरील वाद मिळकतीचे नमूना ८ नुसार वादी ही वाद मिळकतीची मालक आहे, ही बाब सुध्दा निर्विवादित आहे. तसेच वाद मिळकतीचे सरसनिरस मानाने वाटप होऊन पृथक कब्जा मिळणेबाबत, बक्षीसपत्र बंधनकारक नसलेचे जाहीर होऊन मिळणेबाबत व निरंतर ताकिदीबाबत प्रतिवादी यांनी वादी, बबिता तुकाराम कांबळे व कलावती हिंदूराव कांबळे यांचेविरुध्द रे.दि.मु.क्र.१६२२/२०२० हा दावा दाखल केला आहे, ही बाब सुध्दा निर्विवादित आहे.

०९. वादीने निशाणी क्र.५ प्रमाणे वाद मिळकतीमध्ये प्रतिवादी यांनी घुसू नये, वादीला वाद मिळकतीत येऊन हुसकावून लावू नये व वादीच्या वाद मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त मागणी केली आहे. सर्वप्रथम इथे वादीस प्रथमदर्शनी हे सिध्द करणे गजजेचे आहे की, वाद मिळकत तिचे वहिवाटीस व ताब्यात आहे. ते दाखविण्यासाठी वादीने निशाणी क्र.८ वर वाद मिळकतीचे नमुना ८ ची प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन केले असता सदर उताऱ्यामध्ये मालक व भोगवटदार सदरी वादीचे नांवाची नोंद आहे. परंतु, वादपत्रातील मजकूर निशाणी क्र.८ वरील नमुना क्र.८ चे विरुध्द आहे, कारण, वादी हिने स्वतः वादपत्रातील परिच्छेद क्र.४ मध्ये वाद मिळकतीवर प्रतिवादीचा ताबा आहे हे मान्य केले आहे. प्रतिवादी हिने अभिलेखावर वाद मिळकतीसंबंधी कर भरण्याच्या पावत्या सुध्दा दाखल केलेल्या आहेत. वादीने उप कार्यकारी अभियंता महावितरण यांना वाद मिळकतीमधील वीज कनेक्शन बंद करण्याकरिता अर्ज केला होता. त्या अर्जाची प्रत अभिलेखावर प्रतिवादी यांनी दाखल केली असून त्याचे अवलोकन केले असता त्यामध्ये वादीने असा मजकूर लिहीलेला आहे की, ती घरामध्ये (वाद मिळकत) राहत नाही, त्यामुळे, वीज कनेक्शन बंद करण्यात यावे. वरील सर्व बाबींचे अवलोकन केल्यावरुन वादी ही सदर वाद मिळकत घरामध्ये राहत नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच वादी यांनी प्रतिवादीचा वाद मिळकतीवरील ताबा मान्य केल्यामुळे प्रतिवादी ही सध्या वाद मिळकतीमध्ये

राहत असलेचे दिसून येते.

१०. वादी आणि प्रतिवादी यांचे कथनांवरुन व वादींनी दाखल केलेली कागदपत्रे आणि त्यावर केलेल्या विवेचनावरून असे दिसून येते की, प्रथमदर्शनी प्रकरण आणि न्यायाचा समतोल हा प्रस्तुत दाव्यातील वादीचे बाजूने दिसून येत नसल्यामुळे वादीचा तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होण्याची शक्यता दिसून येत नाही. त्यामुळे, मुद्दा क्र.१ ते ३ चा साकल्याने विचार करता वादी यांना निशाणी ५ वरील अर्ज फेटाळणे क्रमप्राप्त ठरते. सबब, मी मुद्दा क्रमांक १ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः

## आदेश

१. वादीचा निशाणी ५ वरील तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जाचा खर्च दाव्याचे अंतिम निकालावर अवलंबून राहील.

MOHD. SHARIQUE UR ATA UR RAHMAN
Digitally signed by MOHD. SHARIQUE UR ATA UR RAHMAN
Date: 2022.12.23 18:20:02 +0530

विटा.
दिनांक २३.१२.२०२२.

(मो.शारीक ए.यु. रहेमान)
सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.V. Gaikwad |
| Name of the Court | :- | M.Sharique.A.U. Rahman,<br>Jt.Civil Judge Jr. Dn.,&J.M.F.C.<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 23.12.2022 |
| Order signed by P.O. on | :- | 23.12.2022 |
| Order uploaded on | :- | 23.12.2022. |